निशानी क्र.२१

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल दिनांक | : | ०२/०१/२०२१ | | |
| | | नोंदणी दिनांक | : | ०२/०१/२०२१ | | |
| | | निर्णय दिनांक | : | १४/१०/२०२५ | | |
| | | कालावधी | : | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | ०४ | ०९ | १२ |

## चंद्रपूर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी, यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी प्रशांत प्र. कुलकर्णी)

**नियमित फौजदारी खटला क्र.७/२०२१**

**(CNR No.MHCH030000102021)**

महाराष्ट्र शासन तर्फे,
रामनगर पोलीस ठाणे,चंद्रपूर,
ता. व जिल्हा चंद्रपूर. ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१) आतीश दिलीप कोंडबत्तुलवार,
वय – २६ वर्षे, धंदा – मजुरी,

२) आकाश रामदास पाचपोर,
वय – २६ वर्षे, धंदा – मजुरी,
दोघेही रा. शामनगर, मनोहर बेकरी जवळ,
चंद्रपूर, ता. व जिल्हा चंद्रपूर. ... **आरोपी**

**गुन्हा – भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४,५०६ सहकलम ३४ अन्वये**

**निशानी क्र.२१**

..............................................................................................................................

सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. विद्या जी. काकडे

आरोपींतर्फे – विधीज्ञ श्री सपन पी. पुगलिया

..............................................................................................................................

## न्या य नि र्ण य

(दिनांक १४/१०/२०२५ रोजी पारित)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

२. **अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

फिर्यादी सुनिल रामचंद्र मंचर्लावार, रा. शामनगर, भगतसिंग चौकाजवळ, चंद्रपूर ता. व जि. चंद्रपूर याने रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे हजर होवून तोंडी तक्रार दिली की, दि.२६.१०.२०२० रोजी रात्री ८.०० च्या सुमारास तो त्यांच्या वार्डातील अमन पानठेल्यावर मॅच पाहात असताना त्यांच्या वार्डात राहणारे छोटया पाचपोर, टिक्या, नाना कॅटर्सवाला हे तिघे पानठेल्यावर आले. त्यावेळी फिर्यादीने सहज मॅच हारते असे म्हणाला असता तिन्ही आरोपींनी हाताबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. आरोपी छोटया पाचपोर याने त्याच्या हातातील रॉडने फिर्यादीच्या उजव्या कानावर मारले. त्यामुळे फिर्यादीच्या कानाला दुखापत होवून रक्त निघाले. आरोपी टिक्या, नाना यांनी फिर्यादीला हाताबुक्यांनी मारहाण करुन शिविगाळ केली व पुन्हा मारण्याची धमकी दिली. ती फिर्याद गुन्हा

क्र.१०२२/२०२० भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे नोंदविण्यात आली.

३. सदरच्या गुन्हयाचा तपास नाईक पोलीस शिपाई, पेतरस सखाराम सिडाम, रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी जखमी फिर्यादी साक्षीदाराची वैद्यकीय तपासणी करुन वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. घटनास्थळ पंचनामा नोंदविला, गुन्हे कामी वापरलेला लोखंडी रॉड जप्ती पंचनामा नोंदवून जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुद्ध पुरावा आढळल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यावर नि.क्र.१६ प्रमाणे त्यांच्यावरील दोषारोप निश्चित केले व आरोपींना ते त्यांच्या भाषेत समजावून सांगितले. आरोपींनी गुन्हा कबुल केला नाही त्यामुळे प्रकरणाची संपरिक्षा करावी लागली. अभियोग पक्षाच्या एकमेव साक्षदाराच्या तोंडी पुराव्यात आरोपींनी केलेल्या गुन्हयाबाबत त्यांचे विरुद्ध काहीही आले नाही. त्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नुसार जबाब नोंदविण्यात आले नाही.

५. सदरच्या प्रकरणाचा न्यायनिर्णय होण्याकरीता माझ्या अवलोकनार्थ खालील प्रश्न उपस्थीत झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसहीत खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

<u>**निशानी क्र.२१**</u>

| अ.क्र. | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. २६/१०/२०२० रोजी रात्री ०८.०० च्या सुमारास शामनगर, चंद्रपूर ता. व जि. चंद्रपूर येथे आरोपी क्र.२ याने फिर्यादीच्या उजव्या कानावर लोखंडी रॉडने मारुन ईच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.२ याने फिर्यादीला फिर्यादीनला हाताबुक्यांनी मारहाण केली ? | **नाही.** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला शिविगाळ व मारहाण करुन त्याच्या हातून सार्वजनिक शांततेचा भंग होईल अशा हेतुने त्यास चिथावणी दिली ? | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीला मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | **नाही.** |
| ५. | काय आदेश ? ... | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ एकमेव साक्षीदार फिर्यादी सुनिल रामचंद्र मंचर्लावार याची साक्ष नोंदविलेली आहे.

तसेच इतर कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. आरोपींनी त्यांच्या बाजुने कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**प्रश्न क्र. १ ते ५ बाबत**

७. अभियोग पक्षाने साक्षीदार सुनिल रामचंद्र मंचर्लावार यांना नि.२० प्रमाणे फिर्यादी व जखमी साक्षीदार म्हणून तपासले आहे. त्यांनी त्यांच्या न्यायालयासमोरील जबाबात कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. आरोपी त्यांच्या वार्डातील रहिवासी आहेत. दि.२६.१०.२०२१ रोजी रात्री ८.०० च्या सुमारास त्याचा आरोपींशी किरकोळ वाद झाला त्यामुळे त्याने रागाच्या भरात आरोपींच्या विरुद्ध रामनगर पोलीस ठाणे चंद्रपूर येथे फिर्याद नोंदविली. त्याला त्याची फिर्याद व प्रथम खबर यात काय लिहिले आहे हे माहित नाही.

८. साक्षीदार सहाय्य करीत नसल्याने त्याच्या उलटतपासाची परवानगी सरकारी अभियोक्ता यांना देण्यात आली. त्यावेळी सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात पोलीसांनी नोंदविलेल्या त्याच्या फिर्यादीत व जबाबात नमुद असल्याप्रमाणे घटना घडल्याचे नाकारले. आरोपींच्या विधिज्ञांनी घेतलेल्या उलटतपासात त्याने कबुल केले की, त्याचा व आरोपींचा न्यायालयाच्या बाहेर आपसी समझोता झालेला असून सद्या त्याचे आरोपींसोबत चांगले संबंध आहेत. त्यामुळे त्याला सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही व इतर साक्षीदार तपासायचे

नाहीत. फिर्यादीने आपसी समझोता पुरसिस नि.१९ वर त्याची स्वाक्षरी असल्याचे व त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे कबुल केले.

९. सरकारी अभियोक्ता व आरोपींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

१०. सदरच्या प्रकरणातील प्रमुख जखमी/फिर्यादी साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केले नाही. अभियोग पक्षाने तपासलेल्या एकमेव फिर्यादी साक्षीदाराने त्याला आरोपींकडून मारहाण, शिविगाळ झाल्याबाबत व आरोपींनी त्यास मारण्याची धमकी दिल्याबाबत एक अवाअक्षर देखील त्याच्या सरतपासात काढले नाही. त्यामुळे इतर साक्षीदारांना तपासून त्याचा अभियोग पक्षास उपयोग नाही. त्यामुळे नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोगपक्षातर्फे दाखल असलेला कागदोपत्री पुरावा फिर्याद, प्रथम खबर, घटनास्थळ पंचनामा, जप्ती पंचनामा, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र सिद्ध करण्यात आलेले नाही. एकुणच अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवलेले दोषारोप पुराव्याअभावी सिद्ध होवू शकले नाहीत. म्हणून मी प्रश्न क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवून प्रश्न क्र. ५ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १ व २ यांची भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ च्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**निशानी क्र.२१**

२. आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. सदरच्या प्रकरणातील जप्त मुद्देमाल लोखंडी राड हा निरुपयोगी असल्याने अपील कालावधीनंतर तो नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये जामीनाची पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

Digitally signed by PRASHANT PRABHAKAR KULKARNI
Date: 2025.10.14 17:29:48 +0530

(प्रशांत प्र. कुलकर्णी)

दिनांक :– १४.१०.२०२५ मुख्य न्यायदंडाधिकारी,

चंद्रपूर